**BDC LIBRARY**
**News Paper Clipping**
**A.Y. 2025-26**

# प्रीतिसंगम



टण शहरातून ३०० फुट तिरंगा ध्वजाचे संचलन २) कल्याणी इंग्लिश मिडीयम स्कूलच्या विद्यार्थ्यांचे देशभक्ती गीत ३) बाळासाहेब देसाई कॉलेज येथे एनसीसी विद्यार्थ्यांचे रायफल ड्रीम, वॉर डेमो कवायत

# पाटण तालुक्यात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

## ३०० फुट लांबीच्या तिरंगा ध्वजासह विद्यार्थ्यांचे संचलन

**पाटण/प्रतिनिधी:– एस.मोहिते-**

पाटण शहरासह तालुक्यात ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. तालुक्यातील सर्व प्राथमिक शाळा, हायस्कूल, महाविद्यालय, शासकीय कार्यालये, सहकारी कार्यालय येथे ध्वजारोहण करण्यात आले. यानिमित्ताने पाटण शहरातून विद्यार्थी परिषदेच्या वतीने विद्यार्थ्यांनी ३०० फुट लांबीच्या तिरंगा ध्वजासह संचलन केले. यावेळी पाटण वासियांनी या ध्वजावर पुष्प वृष्टी केली. पाटण तहसिल कार्यालय येथे सकाळी ९.१५ वा. शासकीय इतमामात प्रांताधिकारी सोपान टोंम्पे यांच्या हस्ते, तहसिलदार अनंत गुरव यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी पाटण तालुक्यातील सर्व माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला.

७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त पाटण तालुक्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थी परिषदेचा पाटण शहरात लक्षवेधक ठरलेल्या ३०० फुट तिरंगा ध्वजाचा संचलनासह बाळासाहेब देसाई कॉलेज येथे ऑपरेशन सिंदुर वर आधारित एनसीसी कॅडेटमधील विद्यार्थ्यांनी रायफल ड्रीम, वॉर डेमो व परेड लक्षवेधी ठरली यावेळी कोयना शिक्षण संस्थेचे संचालक याज्ञसिंह पाटणकर, संजीव चव्हाण यासह माजी सैनिकांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या मॉग ड्रिल चे कौतुक केले. यावेळी उपस्थित माजी सैनिकांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

पाटण न्यायालय, पाटण पोलीस स्टेशन, कोयनानगर पोलीस स्टेशन, मल्हारपेठ पोलीस स्टेशन, पाटण पंचायत समिती, पाटण नगरपंचायत, कै. ज्ञानोजीराव साळुंखे हायस्कूल, माने देशमुख विद्यालय, सौ.सुलोचनाबाई पाटणकर कन्याशाळा, जि.प.प्राथमिकच्या सर्व शाळा, यासह सर्व विद्यालय, महाविद्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खाजगी शाळा, बँका, पतसंस्था, ग्रामपंचायती, सोसायट्यांमध्ये विविध उपक्रमांनी प्रजासत्ताकदिन उत्साहात साजरा करण्यात आला.

# श्री निनाईदे

**कोळे/प्रतिनिधी:**

कै. सौ. द्वारकाबाई तुकाराम सुकरे प्रतिष्ठान यांच्या वतीने आयोजित वक्तृत्व, निबंध, काव्यवाचन व रांगोळी अशा विविध स्पर्धा दि. २४ जानेवारी रोजी पार पडल्या.

या स्पर्धांतील वक्तृत्व स्पर्धेत